सन २०१९-२० करिता राष्ट्रीय कृषि विकास योजना-रफ्तार या योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ₹ २९.९० कोटी निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासनन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: राकृवि ०३१९ /प्र.क्र.८९/१४-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८/०८/२०१९

संदर्भ :

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.०४१८/प्र.क्र.१५५/१४-अे, दि. २७/०४/२०१७
२. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.०१.०४.२०१९
३. वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९
४. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. ७-१/२०१९- आरकेव्हीवाय, दि. २२/०२/२०१८
५. राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या (SLSC) २७ व्या बैठकीचे इतिवृत्त- पत्र क्र. राकृवि०५१९-/ प्र.क्र.१४३/ १४-अे, दि. १८/०७/२०१९, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग, केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र क्र. १-१५/२०१९ आरकेव्हीवाय/१, दि. ०६/०६/२०१९
७. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.राकृवि ०३१९/प्र.क्र.८८/१४-अे, दि. २९/०६/२०१७
८. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/नि/राकृवियो/नि.मा./१००३, दि. १६/०८/२०१९.

प्रस्तावना :

राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार ही योजना केंद्र व राज्य शासनाच्या अनुक्रमे ६०:४० प्रमाणात अर्थसहाय्याने राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत **अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता** केंद्र शासनाने महाराष्ट्रास सन २०१९-२० करिता एकूण **₹ ५९.८० कोटी** रक्कमेचे (केंद्र हिस्सा रु. **३५.८८ कोटी** + राज्य हिस्सा रु. **₹ २३.९२ कोटी**) वार्षिक नियतवाटप (Allocation) मंजूर केले आहे. सदर नियत वाटपाच्या अनुषंगाने संदर्भांकित दि. २९ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

संदर्भाधिन दि.०६ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनाने राज्यास अनुसूचित जाती प्रवर्गाचा पहिल्या हप्त्यातील केंद्र हिस्याचा ₹ १७.९४ कोटी निधी वितरीत केला असून त्या समरुप राज्य हिस्याचा ₹ ११.९६ कोटी निधी असा अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता एकूण ₹ २९.९० कोटी निधी वितरणासाठी उपलब्ध आहे.

राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत राज्यस्तरीय प्रकल्प मंजूरी समितीची २७ वी बैठक दि.०४/०७/२०१९ रोजी पार पडली, या बैठकीत जुने व नवीन अशा एकूण ७४ प्रकल्पांची सन २०१९-२० मध्ये अंमलबजावणी करण्यास समितीने मान्यता दिलेली आहे. सदर मंजूर प्रकल्पांपैकी ज्या प्रकल्पांसाठी अनुसूचित जाती प्रवर्गाच्या निधीची आवश्यकता आहे त्या प्रकल्पांना निधी वितरणाचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाने संदर्भाकिंत दि.१६/०८/२०१९

रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यानुषंगाने रु. २९.९० कोटी निधी आयुक्त (कृषि) यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णयः

१. या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी **अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता** केंद्र व राज्याच्या ६०:४० अर्थसहाय्याच्या प्रमाणात **एकूण ₹२९.९० कोटी निधी (रुपये एकोणतीस कोटी नव्वद लाख फक्त)** आयुक्त (कृषि) यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे पुढीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येत आहे -

(रक्कम ₹ कोटी)

अ. क्र.	योजनेचे नाव	अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता मंजूर निधी (६०:४०)		
		केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा	एकूण
१.	राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार - सर्वसाधारण राकृवियो (Normal RKVY)	१७.९४	११.९६	**२९.९०**

२. परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार, राष्ट्रीय कृषि विकास योजना - रफ्तार या योजनेंतर्गत **केंद्र हिस्याचा ₹१७.९४ कोटी (रुपये सतरा कोटी चौऱ्याण्णव लाख फक्त),** आणि **राज्य हिस्स्याचा ₹ ११.९६ कोटी (रुपये अकरा कोटी शहाण्णव लाख फक्त)** असा एकूण **₹ २९.९० कोटी (रुपये एकोणतीस कोटी नव्वद लाख फक्त)** निधी उपलब्ध करुन दिला असून तो योजनेच्या केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या तरतुदीतून खर्ची टाकावा -

प्रवर्ग	केंद्र हिस्सा	राज्य हिस्सा
अनुसूचित जाती	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचित जाती उपयोजना (००) (२९) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (केंद्र हिस्सा ६० टक्के) (२४०१ A७२६) ३३-अर्थसहाय्य	**मागणी क्रमांक डी -३** २४०१- पीक संवर्धन (००) (७८९) अनुसूचित जाती उपयोजना (००) (३०) कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत अर्थसहाय्य (पंचवार्षिक योजनेअंतर्गत योजना) (राज्य हिस्सा ४० टक्के) (२४०१ A७३५) ३३-अर्थसहाय्य

३. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या ₹ २९.९० कोटी रक्कमेचे कोषागारातून आहरण व वितरणाकरिता सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी वितरीत केलेला ₹२९.९० कोटी निधी कोषागारातून आहरित करुन आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावे उघडण्यात आलेल्या स्वीय प्रपंजी

लेखा खाते (PLA) मध्ये जमा करावा व तसे शासनास अवगत करावे आणि तद्‌नंतर सदर निधी संबंधित प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी विविध अंमलबजावणी यंत्रणांना वर्ग करण्यात यावा.

५. या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय कृषि षिकास योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता ₹२९.९० कोटी निधीपैकी सद्य:स्थितीत पुढील अंमलबजावणी यंत्रणांना ₹९.९५ कोटी (रुपये नऊ कोटी पंच्यान्नव लाख) निधी प्रकल्पनिहाय वितरण करण्यात येत असून, उर्वरित ₹१९.९५ कोटी निधीचे प्रकल्पनिहाय वितरण यथावकाश कळविण्यात येईल. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेल्या ₹९.९५ कोटी निधीच्या प्रकल्पनिहाय वितरणाबाबतचा तपशिल सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केला आहे व त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे : -

(रक्कम ₹ कोटी)

अ.क्र.	वितरीत निधीचा अंमलबजावणी यंत्रणानिहाय तपशील	वितरीत निधी
१	आयुक्त (कृषि)	४.५०
२	कृषि विद्यापीठे	०.४५
३	व्यवस्थापकीय संचालक, महा. राज्य वखार महामंडळ	५.००
एकूण वितरीत निधी (अनुसूचीत जाती प्रवर्ग)		**९.९५**

६. उपरोक्त मंजूर निधीचे तात्काळ उपयोजन होण्याच्या दृष्टीनेच कोषागरातून आहरण करावे आणि सर्व विभागांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या निधीचा तात्काळ विनियोग करावा, अंमलबजावणी यंत्रणांनी निधी उपयोजनाविना बँक खात्यामध्ये जमा करुन ठेवू नये.

७. राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत सन २००७-०८ पासून सन २०१८-१९ पर्यंत विविध विभागांना वितरीत केलेल्या निधीचे लेखापरीक्षण होऊन तसे प्रमाणित केल्यानंतर सदर योजनेंतर्गत उर्वरीत निधी दुसऱ्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाकडून वितरीत करण्यात येणार आहे, त्यामुळे सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी/विभागांनी त्यांना सन २००७-०८ ते सन २०१८-१९ या कालावधीत वितरीत केलेल्या निधीचे सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण झाल्याचे प्रमाणित करावे.

८. या शासन निर्णयान्वये केवळ ‘अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता’ निधी वितरीत करण्यात आला असून सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी त्यांना मंजूर केलेल्या प्रकल्पांतर्गत अनुसूचीत जाती प्रवर्गासाठी आवश्यक असलेल्या निधीकरिता उपरोक्त रकमेचा विनियोग करावा.

९. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यांत येत असलेल्या निधी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांच्या मागणीनुसार वितरीत करण्यात येत आहे तथापि, राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या २७ व्या राज्य स्तरीय प्रकल्प मंजूरी समितीच्या बैठकीत समितीने निदेशीत केल्यानुसार, सन २०१९-२० मध्ये वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचा प्राधान्याने जुने अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी वापर करण्याची जबाबदारी संबंधित अंमलबजावणी यंत्रणांची राहील. कोणत्याही नविन अथवा जुन्या प्रकल्पांतर्गत निधी अभावी देयकांची प्रलंबित दायित्व निर्माण होणार नाही याची संबंधित अंमलबजावणी यंत्रणा व प्रशासकीय विभागांनी दक्षता घ्यावी.

१०. वैयक्तिक लाभाच्या प्रकल्पांतर्गत सर्व विभागांनी / अंमलबजावणी यंत्रणांनी लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) अनुदान वितरीत करावे.

११. हा शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि. ०८.०७.२०१९ नुसार विहीत केलेल्या अटींची पुर्तता होत असल्याने तसेच, सदर परिपत्रकानुसार या विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२८१५०६२५१२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहपत्र :- परिशिष्ट - अ

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2019.08.28 15:16:47 +05'30'

(श्रीकांत चं. आंडगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (पदुम व पणन), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सचिव (जलसंधारण), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. व्यवस्थापकीय संचालक (MSHMPB), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे
११. आयुक्त (पशुसंवर्धन), औंध, पुणे
१२. आयुक्त (दुग्धव्यवसाय), वरळी, मुंबई
१३. आयुक्त (मत्स्यव्यवसाय), मरीन ड्राईव्ह, मुंबई
१४. महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, भोसले नगर, पुणे.
१५. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१६. संचालक (प्रक्रिया व नियोजन), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१७. संचालक (रेशीम), विभागीय आयुक्तालय परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर
१८. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे
१९. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
२०. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
२१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. सहायक संचालक, (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
२३. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
२४. मा. मंत्री (कृषि व फलोत्पादन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२५. निवड नस्ती.

परिशिष्ठ - अ

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शाासन निर्णय क्र. राकृवि ०३१९ /प्र.क्र.८९/१४-अे , दि. २८/०८/२०१९ चे सहपत्र

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत प्रकल्प / अंमलबजावणी यंत्रणा निहाय अनुसूचीत जाती प्रवर्गासाठी रु. ९.९५ कोटी निधीचे वितरण

वर्ष - २०१९-२० **(रक्कम रु. कोटीत)**

अ. क्र.	प्रकल्पाचे नाव	प्रकल्प मंजूरीचे वर्ष	प्रकल्प कालावधी	प्रकल्प किंमत	प्रकल्प किंमतीपैकी (राकृवियो हिस्सा)	सन २०१८-१९ मध्ये वितरीत केलेला निधी	सन २०१९-२० करिता शिल्लक प्रकल्प किंमत	सन २०१९-२० मध्ये वितरीत केलेला निधी	वितरण बाकी असलेला निधी	अनुसूचीत जाती प्रवर्गासाठी वितरीत करण्यात येत असलेला निधी
१	२	३	४	५	६	७	८ (६-७)	९	१०	११
१	शासकीय रोपवाटिकांमध्ये कलम / रोपे तयार करणे	२०१८-१९	१	१५.२२	१५.२२	०.००	१५.२२	०.००	१५.२२	२.००
२	निर्यात व प्रक्रिया विषयक पायाभूत सुविधांसह मल्टीचेंबर मल्टीकमोडीटी कोल्ड स्टोरेज प्रकल्प वाशी नवी मुंबई येथे उभारणे	२०१९-२०	१	१४.००	१३.९९	०.००	१३.९९	०.००	१३.९९	२.००
३	क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वनामती व रामेती येथे प्रशिक्षण व क्षमता बांधणी	२०१९-२०	१	७.४९	७.४९	०.००	७.४९	०.००	७.४९	०.५०
अ	**आयुक्त (कृषि)**			**३६.७१**	**३६.७०**	**०.००**	**३६.७०**	**०.००**	**३६.७०**	**४.५०**
४	हळद पिकातील उत्पादन वाढीसाठी उपयुक्त सुक्ष्म जीवांचे टाल्कम पावडर आधारित मिश्रण तयार करण्याचा प्रकल्प	२०१९-२०	१	२.५०	१.९८	०.००	१.९८	०.००	१.९८	०.३०
५	वनामकृवि, परभणी येथील ऊतीसंवर्धित वाढीव निर्मितीच्या प्रकल्प बळकटीकरणाचा प्रस्ताव	२०१९-२०	१	१.००	१.००	०.००	१.००	०.००	१.००	०.१५
ब	**सर्व कृषि विद्यापीठे**			**३.५०**	**२.९८**	**०.००**	**२.९८**	**०.००**	**२.९८**	**०.४५**
६	विदर्भ व मराठवाडयातील वखार महामंडळाच्या गोदामांचे, सिमेंट रस्ता, अप्रॉन गटर, संरक्षीत भींत आणि शेतकरी व हमालांकरीता शेड या माध्यमातून दर्जा सुधारण्याचा प्रकल्प	२०१९-२०	१	४९.७७	४९.७७	०.००	४९.७७	०.००	४९.७७	५.००
क	**व्यवस्थापकीय संचालक, महा. रा. वखार महामंडळ**			**४९.७७**	**४९.७७**	**०.००**	**४९.७७**	**०.००**	**४९.७७**	**५.००**
एकूण (अ+ब+क)				**८९.९८**	**८९.४५**	**०.००**	**८९.४५**	**०.००**	**८९.४५**	**९.९५**